# स मा रो प

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी पेशवाईचा शेवट केला. पुण्याच्या शनिवारवाडयावरील भगवा झेंडा खाली खेचला गेला व हिंदुस्थानच्या गुलामगिरीचे प्रतिक असलेले युनियन जॅक तेथे फडकू लागला. इ.स. १८४८ पर्यन्त मराठ्यांच्या अस्मितेची जाणीव करून देणारी सातारा छत्रपतींची गादी सुरक्षित राहिली. तथापि सन १८४८ मध्ये ब्रिटिशांनी सातारा छत्रपतींचे राज्यही खालसा केले. परंतु औंध संस्थान मात्र ब्रिटिशांनी नष्ट केले नाही. ब्रिटिशांना ते नष्टच करावयाचे असते तर ते अगदी चुटकीसरशी औंध संस्थान खालसात विलीन करू शकले असते. परंतु ब्रिटिशांनी तसे न करता इ.स.१८४८ मध्ये औंध अधिपतींशी स्वतंत्र करार करून औंध संस्थानला जीवदान दिले आणि हेच औंध संस्थानचे महत्वाचे वैशिष्ट्य होय.

औंध संस्थानच्या अधिपतींचे प्रतिनिधी घराणे हे फार जुने सरदार घराणे होते. या घराण्याचे संस्थापक परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचा छत्रपती राजारामाच्या कारकिर्दीमध्ये भाग्योदय होऊन छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दिमध्ये त्यांच्या सत्तेचा विकास झाला. कालांतराने प्रतिनिधींच्या जहागिरीचे औंध संस्थानात रूपांतर झाले. औंधचे प्रतिनिधी यांची मूळ जहागीर १८ लाख रूपयांची होती. परंतु यामध्ये पुढे ब-याच उलथापालथी होऊन प्रतिनिधींची जहागीर घटत गेली. सन १८०६ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांनी परशुराम श्रीनिवासराव प्रतिनिधी यांना कैद करून त्यांची जहागीर जप्त केली. सन १८११ मध्ये पेशव्यांनी प्रतिनिधींना ती परत केली. परंतु प्रतिनिधींच्या मूळ १८ लाख रूपयांच्या जहागिरीपैकी केवळ दोन लाख रूपयांची जहागीर पेशव्यांनी प्रतिनिधींना परत केली. एवढयावरच प्रतिनिधींच्या जहागिरीची लचकेतोड थांबली नाही. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी आपल्या सोयीसाठी प्रतिनिधींच्या जहागिरीमध्ये अव्यवहार्य बदल घडवून आणले या बदलांच्यावेळी ब्रिटिशांनी औंध संस्थानच्या सोयी-गैरसोयीकडे अजिबात लक्ष दिले नव्हते.

त्यामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीची औंध संस्थानची भौगोलिक परिस्थिती फार विचित्र असल्याचे दिसून येते. विसाव्या शतकात औंध संस्थानात जे प्रशासकीय विभाग होते ते कोठेही सलग एकासएक लागून असे नव्हते. एवढेच नव्हे तर आटपाडी तालुका सोडल्यास इतर प्रशासकीय विभागातील गावेही एकासएक लागून सलग अशी नव्हती. थोडक्यात विसाव्या शतकात औंध संस्थानातील बहुसंख्य गावे विखुरलेली होती. त्यामुळे संस्थानच्या प्रगतीला मोठा अडथळा निर्माण झालेला होता. असे असले तरी विसाव्या शतकामध्ये औंध संस्थानने महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील तत्कालीन संस्थानांच्या तुलनेने मोठी प्रगती केली असल्याचे आढळते. औंध संस्थानचे पुरोगामी, सुधारणावादी, सुशिक्षित अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचा मोठा वाटा होता हे नाकारता येत नाही.

सामाजिक परिवर्तन :

विसाव्या शतकामध्ये सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात औंध संस्थान तत्कालीन संस्थानांच्या मानाने आघाडीवर होते. त्यावेळी समाजात जातीभेदाची फार मोठी दरी निर्माण झाली होती. संपूर्ण देशात स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव विकोपाला गेलेला होता. हे समाज जीवनाला, राष्ट्राला घातक होते. समाजातील जातीभेदाची ही दरी, उच्चनीच भेदभाव नष्ट करण्यासाठी संपूर्ण देशात समाजसुधारणेची, अस्पृश्योध्दाराची चळवळ सुरू झालेली होती. अनेक समाजसुधारकांनी आपआपल्या परीने या चळवळीचा प्रवाह विस्तृत करण्याचा सफल प्रयत्न केला होता. दलितांचे थोर नेते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ मध्ये अस्पृश्योध्दारासाठी महाडचा रणसंग्रामाचे शिंग फुंकले होते. मंदिर प्रवेशाची चळवळ उभारली होती. संपूर्ण देशात स्पृश्य-अस्पृश्यांच्या संघर्षाने उग्र स्वरूप धारण केले होते. या पार्श्वभूमीवर औंध संस्थानची सामाजिक परिस्थिती पाहता, औंध संस्थानातील अस्पृश्यता बऱ्याच प्रमाणात नाहीशी

झाल्याचे आढळून येते. संस्थानातील शाळा, मंदिरे, सार्वजनिक सभा, शासकीय कचेऱ्या, इतकेच नव्हे तर संस्थानाधिपतींचा राजवाडा देखील अस्पृश्यांना खुला होता. यावरून विसाव्या शतकामध्ये या क्षेत्रात औंध संस्थाने केलेल्या प्रगतीची कल्पना येऊ शकते. या पाठीमागे औंध अधिपती बाळासाहेबांची पुरोगामी दृष्टी कार्यरत असल्याचे दिसून येते. बाळासाहेब स्वत: अस्पृश्यता पाळीत नव्हते. पंक्ती भेद मानीत नव्हते. बाळासाहेबांची मुले-मुली अस्पृश्यांच्या लग्नसमारंभात सामील होत असत. आरोग्यदिनाच्या दिवशी स्वत: बाळासाहेब व राणीसाहेब अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन पाहणी करत. राणीसाहेब अस्पृश्य स्त्रीयांना कुंकू लावीत व त्यांच्या कडूनही लावून घेत. अशाप्रकारे औंध अधिपतींनीच स्वत:च्या आचरणातून संस्थानला आदर्श घालून दिला होता. अशाप्रकारे बाळासाहेबच अस्पृश्योध्दा-रासाठी कृतीशील असल्यामुळे सर्व संस्थानात अस्पृश्योध्दाराची मोहीम सुरू झाली होती. त्यामुळेच औंध संस्थानमध्ये सामाजिक क्षेत्रात मोठेच परिवर्तन घडून आलेले दिसून येते.

सन १९२१ चा हिंदू विधवेच्या वारसा हक्का संबंधीचा व सन १९२९ चा दत्तक विधानासंबंधीचा कायदा हे औंध संस्थानात लागू असलेले दोन कायदे ब्रिटिश मुलखातही अनुकरण करण्यासारखे होते. ते औंध संस्थानच्या सामाजिक प्रगतीचे व संस्थानाधिपतीच्या पुरोगामित्वाचे द्योतक होते.

धार्मिक सुधारणा :

विसाव्या शतकात धार्मिक बाबतीतही औंध संस्थानने उल्लेखनीय कामगिरी केलेली होती. संस्थानचे तत्कालीन अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे स्वत: परंपरावादी, रूढिप्रिय, दैववादी होते. श्री. अंबाबाई ही प्रतिनिधी घराण्याची कुळस्वामिनी होती. बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे देखील श्री. अंबाबाईचे परमभक्त होते. परंतु असे असले तरी ते अंधश्रध्दाळू नव्हते. देवाच्या

धर्माच्या नावावर भोंदगिरी करणाऱ्या साधुसंतांना त्यांनी संस्थानात कधीच आश्रय दिला नाही. बाळासाहेब पंतप्रतिनिधी परंपरावादी असले तरी सुधारणेचे त्यांना वावडे होते असे नाही तर बदलत्या परिस्थितीचा विचार करून आपले विचार बदलण्याची, नवीन बदलाला सामोरे जाण्याची व ते स्वीकारून पचविण्याची त्यांची ताकद होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदु धर्मास लागलेली ओहोटी, देशात उसळलेली धर्मांतराची लाट या घटनेस इतर अनेक गोष्टी जशा कारणीभूत होत्या तसेच सर्वसामान्य लोकांना प्राचीन हिंदु-धर्मग्रंथांचे व्यवस्थित ज्ञान होत नव्हते. हेही हिंदु धर्माच्या अधोगतीचे एक कारण होते. हिंदुंचे प्राचीन धर्मग्रंथ, वेद, पुराणे यांचे सामान्य लोकांना व्यवस्थित ज्ञान नसल्यामुळे धर्म म्हणजे काय ? खरा धर्म कोणता ? जगात सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या हिंदु धर्माची तत्वे कोणती ? या गोष्टींचे योग्य आकलन होऊ शकत नव्हते. त्यामुळे अंधश्रध्दा हेच हिंदुधर्माचे प्रमुख अंग बनून राहिले आहे याची औंध अधिपती बाळासाहेबांना जाणीव होती. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना धर्मग्रंथांचे ज्ञान व्हावे यासाठी बाळासाहेबांनी धर्मशास्त्राचे गाढे विद्वान, चिकित्सक अभ्यासक पंडीत श्रीपाद दामोदर सातवळेकरांच्या मदतीने ' स्वाध्याय मंडळ, औंध ' या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. या संस्थेला स्वतंत्ररितीने काम करता यावे यासाठी या संस्थेचा इतर कोणत्याही धार्मिक संस्थेशी संबंध ठेवला नव्हता. या संस्थेने अनेक प्राचीन धर्मग्रंथांचे सार सुटसुटीत भाषेत तयार करून ग्रंथरूपाने सर्वसामान्यांपर्यन्त पोहोचविण्याचे कार्य केले. सर्व भारतभर धार्मिक प्रबोधनाची चळवळ सुरू केली. धार्मिक ज्ञानाचा सर्व भारतभर प्रसार व्हावा यासाठी या संस्थेने हिंदी या राष्ट्रभाषेतून ग्रंथनिर्मिती केली. वैदिक धर्म, गीता ही हिंदी तर पुरूषार्थ श्रीमद्भगवद्गीता ही मराठी मासिके सुरू केली. स्वाध्याय मंडळाचे नाव भारतभर पसरले होतेच परंतु आफ्रिका, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे दूरच्या देशातील वाचकासही ते माहित झालेले होते. या स्वाध्याय मंडळाने केवळ संस्थानात, भारतातच नव्हे तर परदेशातही हिंदु धर्मग्रंथांचा साध्या सोप्या भाषेत प्रसार केला.

शैक्षणिक प्रगती :

शैक्षणिक क्षेत्रातही विसाव्या शतकात औंध संस्थानने तत्कालीन इतर संस्थानापेक्षा अधिक प्रमाणावर प्रगती केली होती. तथापि कोल्हापूर संस्थानने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीशी औंध संस्थानने केलेल्या प्रगतीची तुलना होऊ शकत नाही. परंतु औंध संस्थानच्या साधनसंपत्तीच्या मानाने त्याने या क्षेत्रात केलेली कामगिरी स्तुत्यच होती असे म्हणावे लागते. औंधचे तत्कालीन संस्थानाधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना सुरुवातीपासूनच शिक्षणाची आवड होती. शिक्षण हे समाज प्रबोधनाचे महत्वाचे साधन आहे याची जाणीव होती. संस्थानात शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती होणे अशक्य आहे असे त्यांचे प्रामाणिक मत होते.यासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दित संस्थानातील शिक्षणाचा दर्जा वाढून साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न केले. गरीब, होतकरू, हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी त्यांनी औंधला बोर्डिंग सुरू केले. एवढेच नव्हे तर सन १९१६ मध्ये बाळासाहेबांनी सर्व संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. इंग्रजी शिक्षणाचीसुध्दा सोय व्हावी यासाठी औंध येथेच त्यांनी हायस्कूल सुरू केले. तेथे तज्ञ शिक्षकांची नेमणूक केली. औंध अधिपतींच्या या धोरणामुळे औंध संस्थानात प्राथमिक शाळांचे जाळे विणले गेले. संस्थानात एकूण ७२ गावे होती व शाळांची संख्या मात्र ८५ होती. म्हणजे संस्थानातील प्रत्येक गावी शाळा ही होतीच. संस्थानच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे `मॉडेल क्लास ` ही होय. खेडेगावातील एकाच शिक्षकास तीन चार वर्गांना शिकवावे लागत होते. हे काम सोयीचे व्हावे यासाठी संस्थानात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी `मॉडेल क्लास ` नावाने ओळखले जाणारे प्रशिक्षण वर्ग सुरू केले होते. तीन चार वर्गांची मुले घेऊन एकाच शिक्षकाने सोयीचे वेळापत्रक तयार करून त्यांना कशाप्रकारे शिकवावे याचे या वर्गात प्रशिक्षण दिले जात असे. सदर पध्दत

औंध संस्थानात खूप यशस्वी झाली. बाहेरचे शाळा खात्यामध्ये अधिकारी या वर्गाची वेळापत्रके औंध संस्थानाकडून मागवीत होते. प्रौढ शिक्षण वर्ग देखील औंध संस्थानात सुरू करण्यात आले होते. संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण टिकून राहावे यासाठी फिरत्या ग्रंथालयाचीही बाळासाहेबांनी सोय केलेली होती. बाळासाहेबांच्या या शिक्षण विषयक धोरणामुळे विलिनीकरणाच्या सुमारास औंध संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण २० टक्के इतके होते. इतके प्रमाण त्यावेळी दुसरीकडे कोठेही दिसून येत नाही. अनेकांनी औंध संस्थानामध्ये विद्यार्जन करून आपला विकास करून घेतला. कविवर्य ग.दि. माडगूळकर, सुप्रसिध्द साहित्यिक श्री. शंकरराव खरात, उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर, साने गुरुजी व शाहीर शंकरराव निकम यासारख्या प्रभृतींना औंध संस्थानातील प्राथमिक शाळांनी घडविले. धर्मशास्त्राचा गाढा विद्वान, चिकित्सक अभ्यासक पंडित श्रीपादशास्त्री सातवळेकर ही विभूती औंध संस्थानातीलच. ते औंध संस्थानचे भूषण होते. औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या प्रयत्नामुळेच छोटयाशा औंध संस्थानने शिक्षणक्षेत्रात भरीव कामगिरी केल्याचे आढळून येते.

औद्योगिक विकास :

विसाव्या शतकातील औंध संस्थान औद्योगिक प्रगतीच्या बाबतीतही पाठीमागे नव्हते. औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी स्वत: उद्योगप्रिय होते. औंध संस्थानचे औद्योगिकरण करणे हे त्यांचे स्वप्न होते. संस्थानातील बहुतेक लोकांचा व्यवसाय शेती हाच होता. शेतीला पूरक असा इतर व्यवसायांचा विकास झाल्याशिवाय, औद्योगिक प्रगतीची साथ मिळाल्याशिवाय संस्थानातील प्रजेची आर्थिक प्रगती होणार नाही. लोकांचे जीवन सुखी होऊन समाजाला स्थिर स्वरूप प्राप्त होणार नाही आणि संस्थानची आर्थिक प्रगतीही होणार नाही अशी त्यांची खात्री होती. संस्थानात अनेक उद्योगधंद्यांचा विकास झाल्यास लोकांना रोजगार उपलब्ध होईल. शेती व्यवसायावर अवलंबून

राहणाऱ्यांची संख्या कमी होईल. लोकांना मजुरी मिळविण्यासाठी संस्थानाबाहेर जाण्याचा प्रसंग येणार नाही असे त्यांचे प्रामाणिक मत होते. यासाठी बाळासाहेबांनी शेतीस पूरक असा पशुपालनाच्या धंद्यास प्रोत्साहन दिले, सक्रीय मदत केली. आपल्या राज्यात जो कच्चा माल उपलब्ध होतो त्यापासून आपण पक्का बनविला पाहिजे, संस्थानच्या गरजा या परावलंबी असता कामा नयेत, यासाठी त्यांनी अनेक उद्योग धंद्यांना संस्थानात आश्रय दिला. संस्थानातून कापसाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होत होती. त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होत होते. ते टाळण्यासाठी व संस्थानचे उत्पन्न वाढविण्यासाठी कापसापासून सूत तयार करुन ते विणून संस्थानातच कापड तयार करण्यासाठी त्यांनी हातमाग धंद्यांना उत्तेजन दिले. त्यामुळे बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या कारकिर्दीत संस्थानात जवळजवळ सर्वच तालुक्यात हातमागाचा व्यवसाय लहान मोठ्या प्रमाणावर सुरु होता. लोकांना संस्थानातच बराचसा रोजगार उपलब्ध होत होता. औंध अधिपतींच्या या धोरणामुळे सक्रिय मदतीमुळे औंध संस्थानात अनेक लहानमोठ्या उद्योग धंद्यांचा उदय व विकास घडून आला. किर्लोस्कर व ओगले यासारख्या प्रचंड उद्योग समूहाचा उदय व विकास औंध संस्थानामध्येच घडून आला, ही औंध संस्थानच्या प्रगतीला भूषणावह ठरणारी गोष्ट आहे.

सांस्कृतिक प्रगती :

विसाव्या शतकात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक इत्यादी बाबतीत औंध संस्थान प्रगतीशील होते. त्याचप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रातही औंध संस्थानने महत्वपूर्ण कामगिरी बजावलेली होती. औंध संस्थानाधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे स्वत: विद्या व अनेक कलागुणांचे चाहते होते. ते स्वत: उत्कृष्ट किर्तनकार होते. समाज प्रबोधनाचे एक साधन म्हणूनच ते या कलेचा उपयोग करीत असत. त्यांची किर्तने ही उच्च दर्जाची श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडणारी अशीच असत. किर्तनाचे विषयही सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक असे असत. सहकार,

कर्तव्यनिष्ठा, स्वार्थत्याग, लोकसेवा, अस्पृश्योध्दार या विषयावर किर्तने केली जात असत. त्यामुळे लोकांच्या अंत:करणात राष्ट्रभावना वाढीस लागावी, त्यांच्या मनात सुविचार उत्पन्न व्हावेत व त्यांचे जीवन सुखी व्हावे हा औंध अधिपतींचा या पाठीमागील उद्देश होता. बाळासाहेब जसे उत्कृष्ट किर्तनकार होते तसेच ते उत्कृष्ट चित्रकारही होते. राजा रविवर्म्यांच्या तोडीचे ते चित्रकार होते. बाळासाहेबांनी कोणत्याही कलेचे अंधानुकरण केले नव्हते. त्यांची चित्रकलेच्या बाबतीत स्वतंत्र अशी पध्दत होती. त्यास आपण ` औंध स्कूल ऑफ आर्टस् `. असेही म्हणू शकतो. बाळासाहेब पंतप्रतिनिधींचा स्वतंत्र असा चित्रसंग्रह होता. या संग्रहात त्यांनी लाखावधी रूपये खर्चून शेकडो चित्रकारांची जमविलेली चित्रे होती. त्याचप्रमाणे चित्रकलेवर जेवढे म्हणून ग्रंथ प्रसिध्द झाले होते, त्यापैकी अनेक ग्रंथ त्यांनी जमा करून संग्रही ठेवले होते. अनेक चित्रकारांना त्यांनी संस्थानात आश्रय दिला होता.

त्याचप्रमाणे नाटयकला, संगितकला यांचेही ते चाहते होते. संगीत कलेच्या उच्च परंपरेची उपासना करण्यासाठी त्यांनी या विषयाच्या शिक्षणासाठी ` किर्तन संस्था ` या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. अशाप्रकारे खुद्द औंध अधिपतीच सर्व कलांचे अधिष्ठान असल्यामुळे सर्व औंध संस्थान कलामंदिर बनावे हे साहजिकच आहे. औंध अधिपतींच्या या क्षेत्रातील उदार आश्रयामुळे संस्थानात चित्रकार, किर्तनकार, गायक, कवी, यांची एक परंपराच निर्माण झाली होती. त्यामुळे विसाव्या शतकातील औंध संस्थानात विविध ललित कलांचे साम्राज्य निर्माण झालेले दिसून येते.

<u>ग्रामराज्याचा प्रयोग</u>,:

राजकिय व घटनात्मक प्रगतीच्या बाबतीतही औंध संस्थानने मोठीच कामगिरी केली होती. ग्रामराज्याचा प्रयोग ही विसाव्या शतकातील औंध संस्थानच्या इतिहासात घडून आलेली अत्यंत महत्वपूर्ण घटना होय. या घटनेमुळेच छोटे औंध संस्थान प्रकाशात आले. या गोष्टीसाठी इतरत्र जसा जनतेला मोठा

त्याग करावा लागला तसा औंध संस्थानातील प्रजेला कोणत्याही प्रकारचा त्याग करावा लागला नाही, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मात्र यासाठी औंध प्रजेला पाव शतक वाट पहावी लागली हे मात्र खरे आहे. औंध अधिपतींच्या-कडून सुरुवातीस औपचारिक का असेनात परंतु इतर कुठेही न होणाऱ्या रयतसभा बोलाविल्या जात असत. याच रयत सभेचे रूपांतर प्रातिनिधिक सभेत होऊन टप्याटप्याने घटनात्मक प्रगतीच्या दिशेने वाटचाल होऊन सन १९३९ चा स्वराज्याच्या राज्यघटनेचा कायदा औंध संस्थानात अंमलात आला. या कायद्याने औंध संस्थानच्या राजकीय क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण बदल घडून आला. या कायद्याने सत्तांतर घडून आले. सर्व सत्ता राजाकडून प्रजेच्या हाती आली. हे सत्तांतर घडवून आणण्याच्या कामी औंध अधिपतींचे द्वितीय चिरंजीव बॅरिस्टर आप्पासाहेब यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यांच्या उच्च कोटीच्या ध्येयवादामुळे व समाजवादी विचारसरणीमुळेच संस्थानात ही सत्तांतराची क्रांती घडून आली. परंतु या गोष्टीसाठी इतर ठिकाणी राजा व प्रजा असा संघर्ष चालू असताना औंध अधिपती बाळासाहेबांनी स्वखुषीने अधिकार त्याग करून आपले पुरोगामित्व सिध्द केले. त्यामुळे या घटनेचे सर्व श्रेय त्यांनाच दिले पाहिजे. सन १९३९ ची राज्यघटना ही महात्मा गांधींच्या विचारातील ग्रामराज्यावर अधिष्ठित अशी होती. या कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे संस्थानातील प्रत्येक गावी ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली. संस्थानातील प्रत्येक व्यक्तीला या घटनेने भाषण स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य, आचार-विचार स्वातंत्र्य इत्यादी मूलभूत मानवी हक्क बहाल केले. संस्थानातील सर्व प्रौढ स्त्री पुरूषांना मतदानाचा हक्क मिळाला. प्रत्येक गावामध्येच ग्रामपंचायतीद्वारे खटले चालविण्याची, मोफत व तात्काळ न्यायदानाची महत्वपूर्ण तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली. कायदेविषयक सर्व अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले. सर्व भारतदेशाचे या घटनेमुळेच औंध संस्थानकडे लक्ष लागून राहिले होते. परंतु औंध संस्थानातील हे ग्रामराज्य अल्पजिवी ठरले. त्यामुळे ग्रामराज्याचा

प्रयोग औंध संस्थानात व्यवस्थित रुजू शकला नाही असे असले तरी या घटनेला विसाव्या शतकातील औंध संस्थानच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे हे सत्य नाकारता येत नाही.

स्वातंत्र्य चळवळ व औंध संस्थान :

इ.स. १९४२ पासून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढयाची चक्रे वेगाने फिरू लागली. यावेळी औंध संस्थान आपला ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी राबविण्यात मग्न होते. परंतु कॉंग्रेसचा ` चले जाव ` चा लढा निकराला आला तर औंध संस्थान एकाकी राहू शकणार नाही. औंध ग्रामराज्ये व हिंदुस्थानचा स्वातंत्र्य लढा यांचे एकमेकाशी निकटचे नाते आहे याची जाणीव औंधच्या राज्यकर्त्यांना होती. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाने देशात उग्र स्वरुप धारण केले. ` करेंगे या मरेंगे ` हा गांधीजींनी दिलेला अहिंसात्मक मंत्र अनेकांना उमगलाच नाही. प्रत्येकाने आपल्या परीने त्याचा अर्थ लावला. त्यामुळे चळवळीला हिंसात्मक स्वरुप प्राप्त झाले. ९ ऑगस्ट १९४२ रोजीच सत्तर हजार कॉंग्रेस पुढाऱ्यांची जागोजाग धरपकड करण्यात आली. त्यामुळे अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया इत्यादी अनेक क्रांतिकारक भूमिगत झाले. खेडयापाडयातून सभा, मिरवणुका, झेंडावंदन कार्यक्रमाला वेग आला. असाच ९ सप्टेंबर १९४२ ला औंध शेजारी वडूजला मोर्चा निघाला असता ब्रिटिशांनी बेछूट गोळीबार केला. यामध्ये ९ जण हुतात्मे झाले व कित्येक जखमी झाले. या हुतात्म्यामध्ये वडगावचे (जयरामस्वामीचे) परशुराम धार्गे पैलवान यांचा समावेश होता. यावेळी कराड-सांगलीचे क्रांतिवीर गौरीहर सिंहासने यांनी औंधला आश्रय घेतला. खुद्द बॅ. आप्पासाहेबांची पत्नी डॉ. नलिनी पंत यांनी त्यांना आपल्या मोटारीतून कऱ्हाडला पोहचविले. वडूज गोळीबारात जखमी झालेल्या क्रांतीकारकांना त्यांनीच औषधोपचार केला.


औंध संस्थान हे क्रांतीकारकांचा, भूमिगतांचा अड्डाच बनले होते. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारचे कुंडल हे औंध संस्थानातील गाव प्रमुख केंद्र होते. संस्थानांत गुप्तरितीने राहून औंध संस्थानच्या आश्रयानेच क्रांतिसिंह नाना पाटलांनी क्रांती धगधगती ठेवली व १९४२ ते ४६ पर्यन्त अपूर्व कार्य केले. संस्थानातील सर्व ग्रामपंचायती भूमिगतांना मदत करीत होत्या. औंध ग्रामराज्ये म्हणजे नाना पाटलांच्या प्रतिसरकारचाच एक भाग बनला. सांगलीत वसंत दादा पाटील, कोल्हापूरात रत्नाप्पा कुंभार, कोरेगावला तात्या बोराटे, वाईला किसनवीर या क्रांतीकारकांनी स्वातंत्र्य लढा तीव्र बनविला. या क्रांतीकारकांचे आश्रयस्थान औंध संस्थान हेच होते. रत्नाप्पा कुंभारांना सांगली मिरजेत भूमिगत राहणे अशक्य झाल्यास ते औंध संस्थानात किन्हई गावचा आश्रय घेत. तसेच वाईचे किसनवीर हे देखील औंध संस्थानच्या आश्रयानेच क्रांतिकारक हालचाली करीत होते. कोरेगाव, वाई तालुक्यातील सर्व भूमिगतांचा अड्डा किन्हईस असे. औंध संस्थानने क्रांतिकारकांना केवळ आश्रयच दिला नाही तर प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती. संस्थामध्ये देखील नाथा लाड, आप्पा मास्तर लाड, बाबूराव पाटील, रामभाऊ पवार, शाहीर निकम इत्यादी क्रांतिकारकांची एक मालिकाच तयार झाली. शिवाय शंकरभाऊ किर्लोस्कर, यमुताई किर्लोस्कर, अंतोबा फडणीकर, किन्हईचे शाहूपुरे इत्यादी मंडळी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष क्रांतिकारकांना मदत करीत होती, क्रांतीचा भडका पसरवीत होती. खुद्द आप्पासाहेब व डॉ. नलिनीबाई गुप्तरितीने क्रांतिकारकांना भेट होते, मार्गदर्शन करीत होते.

अशाप्रकारे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यास हातभार लावून औंध संस्थानने इतरांप्रमाणेच स्वातंत्र्य लढ्यातील शक्य तेवढा वाटा उचलला होता. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यातील औंध संस्थानचे योगदान किती मोलाचे होते हे लक्षात येते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ` दक्षिणी संस्थान संघराज्य ` निर्माण करून औंध संस्थानचे अस्तित्व टिकविण्याचा आप्पासाहेबांनी प्रयत्न केला. महात्मा गांधींचा या गोष्टीस पाठिंबा होता. परंतु ३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधींचाच वध झाला. त्यामुळे ` दक्षिणी संस्थान संघराज्याची ` औंध ग्रामराज्याची स्फूर्ती देवताच नाहीशी झाली. गांधीजींच्या वधानंतर दुसऱ्याच दिवशी औंध संस्थानने भारतीय संघराज्यात विलीन होण्याचा निर्णय घेतला. लवकरच औंध संस्थानचे विलीनीकरण झाले. अशा त-हेने औंध संस्थानचे तीनशे पंधरा वर्षांचे वेगळे अस्तित्व इतिहास जमा झाले.

परिशिष्ट क्र. १

प्रतिनिधी घराण्याची वंशावळ



## परिशिष्ट क्र. २

## तालुक्यातील गावांची यादी

**औंध तालुका :**

१) औंध (गणेशवाडी, करंड्याचीवाडी), २) पारगांव, ३) चिखलहोळ, ४) किन्हई, ५) विहापूर, ६) बेलवडे, ७) कोर्टी, ८) भोसलेवाडी

(गणेशवाडी व करंड्याची वाडी या दोन वाड्या औंध गावाखाली होत्या तर भोसलेवाडी ही कोर्टी गावाखाली होती.)

**आटपाडी तालुका :**

१) आटपाडी, २) दिघंची, ३) पेठ सुरापूर, ४) लिंगिवरे, ५) राजेवाडी, ६) उंबरगांव, ७) झरे, ८) विभूतवाडी, ९) निंबवडे, १०) पिंपरी बुद्रुक, ११) धरन्निकी, १२) वलवण, १३) धार्णद, १४) चिंचाळे, १५) कामथ, १६) खरसुंडी, १७) नेलकरंजी, १८) गोमेवाडी, १९) हिवतड, २०) करगणी, २१) शेटफळे, २२) तडवळे, २३) बनपुरी, २४) माडगुळे, २५) बोंबेवाडी, २६) पिंपरी खुर्द, २७) कौटुळी, २८) विठलापूर, २९) गळवेवाडी, ३०) शेरेवाडी, ३१) आवळाई, ३२) पळसखेल, ३३) जांभुळणी.

**कुंडल तालुका :**

१) कुंडल, २) रामापुर, ३) आळसंद, ४) सोनकिरे, ५) शिरसगांव, ६) बिचूद, ७) गोंदी, ८) दुधोंडी, ९) कोडोली, १०) कापील, ११) भनू, १२) पाळ्ळी, १३) धोणशी, १४) सैदापूर, १५) विखडे, १६) ओगलेवाडी, १७) किर्लोस्करवाडी.

**गुणदाळ तालुका :**

१) गुणदाळ, २) बोळचिक्कलगी, ३) नंदयाळ, ४) कैंगलकुत्ती, ५) बोबलाद, ६) शिरबूर, ८) कणबूर, ९) जमगी, १०) होसूर, ११) काळीवात, १२) ईंगरगी, १३) कोटयाळ, १४) धनगीं, १५) लोहगांव, १६) टक्कगी, १७) हबनूर.

(यापैकी काळीवात हे ओसाड वस्तीहीन गाव होते.)

परिशिष्ट नं. ३

औन्ध सरकार

औन्ध संस्थानच्या
राज्यघटनेसंबंधीचा कायदा
सन १९३९ चा १ ला

औन्ध स्टेट प्रेस
१९४७

## औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा कायदा १ ला

ज्या अर्थी ता. १-११-३८ च्या जाहीरनाम्यामध्ये औंध संस्थानच्या प्रजाजनांना संपूर्ण स्वराज्य देण्याची आपली इच्छा असल्याबद्दल श्रीमंत सरकार राजेसाहेब संस्थान औंध यांनी अत्यंत उदारपणाने घोषणा केली आहे, त्या अर्थी खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे.

१. (अ) सरनामा : या कायद्यास " औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा १ ला कायदा " असे संबोधण्यात यावे.

(आ) सुरुवात व व्याप्ती : श्रीमंत राजेसाहेब जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा कलमे २० व २१ खेरीज करून अंमलात येईल.

२. औंध संस्थानच्या वेळोवेळी होणाऱ्या कायद्यांची ज्याप्रमाणे वेळोवेळी ठरविण्यात येईल, त्याप्रमाणे हा कायदा खालील गोष्टींची हमी घेत आहे. अहिंसा व सार्वजनिक नीतिमत्ता या दोन तत्त्वांस अनुसरून या कायद्याने संस्थानच्या प्रत्येक नागरिकास, व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, समितिस्वातंत्र्य, सभा व चर्चा स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. तसेच लिंग, जाती धर्म, वर्ण अगर सांपत्तिक स्थिती यामुळे कोणासही राजकीय बाबतीत अपात्र समजले जाणार नाही. कायद्याच्या दृष्टीने औंध संस्थानच्या सर्व प्रजाजनांस पूर्ण समतेने वागविले जाईल. संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पध्दतीने चालेल. प्राथमिक शिक्षण सक्तीने सर्वांस मोफत देण्यात येईल. मतदानाचा अधिकार सर्व साक्षर प्रौढ लोकांस समान राहील. प्रत्येक कामे करू इच्छिणाऱ्या इसमास जगण्यासाठी कमीतकमी लागणारा मोबदला घेऊन काम सरकारकडून मिळविण्याचा हक्क राहील.

३. श्रीमंत राजेसाहेब यांच्याकडे सध्या औंध संस्थानच्या राज्य-कारभारासंबंधी अगर तदनुषंगिक असलेले हक्क, अधिकार व सत्ता, हा कायदा अंमलात आल्यास त्यात अगर त्यास अनुसरून ज्या योजना केल्या असतील, त्याप्रमाणेच त्यांना चालविता येतील. ज्या बाबीसंबंधी या कायद्यात उल्लेख केलेला नाही अशा बाबतीतही कायदे मंडळाचे निर्देशाप्रमाणे त्यांनी आपले अधिकार वापरण्याचे आहेत.

४. संस्थानातील प्रत्येक गाव आपल्या रहिवाशी नागरिकांपैकी ५ कायम व २ राखीव सभासदांची एक पंचायत ३ वर्षांसाठी निवडील, मात्र सर्व अगर काही विशिष्ट कारणाकरिता म्हणून संस्थानातील दोन अगर दोहोंपेक्षा जास्त अशा खेड्यांना एक संयुक्त पंचायत सरकारचे मंजुरीने निवडता येईल.

५. (अ) ग्रामपंचायतीकरिता सभासदांची निवडणूक गावातील साक्षर प्रौढ लोकांच्या मताधिक्याने होईल.

(आ) ग्रामपंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक पंचायतीच्या सभासदांकडून एकमताने होईल. परंतु अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधी सभासदांचे एकमत न झाल्यास पंचायतीच्या सभासदांपैकी कोणाही इसमाची अध्यक्ष-पदासाठी निवडणूक गावातील सर्व मतदार लोकांकडून होईल.

(इ) गावच्या शिक्षणाची व्यवस्था, ग्रामोध्दार कार्य, विशेषत: न्यायदान, पाणीपुरवठा, गावचे आरोग्य, रस्ते करणे व दुरूस्त ठेवणे, मो-या, पूल, बंधारे, सार्वजनिक इमारतींची दुरूस्ती, गायरानाची जोपासना, उजेडाची व्यवस्था ठेवणे, जत्रा व बाजार यांचे नियंत्रण, सरकारच्या सहकार्याने प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था, सूत काढणे वगैरे उद्योग सुरू करून बेकारी-निवरणाचा उपक्रम, पशुसंरक्षण आणि संवर्धन आणि ज्या योजनेमुळे

लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, सौख्य-सोयी किंवा सामाजिक व आर्थिक जीवनाचे संवर्धन होईल अशा योजना करणे हे काम पंचायतीचे असेल. या सर्व बाबी ग्रामपंचायतीने त्यांच्या ताब्यात दिलेल्या रकमेतून व तालुका समिती व सरकार यांचे नियंत्रणाखाली करावयाच्या आहेत.

(ई) जो इसम वेडा असेल अगर ज्या इसमावर नैतिक अध:पतनाचा समावेश होईल अशा गुन्ह्याची शाबिती झालेली असेल अशा इसमाचे नाव मतदारांचे यादीत घातले जाणार नाही. मात्र वर नमूद केलेल्या नैतिक अध:पतनाच्या कारणामुळे मतदानाच्या हक्कास नालायक ठरलेल्या इसमाची नालायकी दूर करण्यासाठी निवडणुकीच्या इन्साफासाठी नेमण्यात आलेल्या कोर्टाकडून नालायकी दूर होण्याच्या कारणासह अशा नालायक ठरलेल्या इसमाने अर्ज दिल्यास व ती कारणे कोर्टास पटल्यास अशा इसमाची नालायकी दूर होऊ शकेल.

मतदारांच्या यादीत नाव दाखल झालेला एखादा इसम वर नमूद केलेल्या कारणामुळे मतदानाचा हक्क असण्यास नालायक आहे असे दिसून आल्यास मतदारांच्या यादीतून अशा इसमाचे नाव खोडले जाईल व तो मतदानास अपात्र समजला जाईल.

६. या कायद्याच्या अम्मलबजावणीकरिताच शक्य तितक्या लवकर संस्थानातील सर्व गावांचे पाच गट करून प्रत्येक गटाला ' तालुका ' असे संबोधण्यात येईल.

७. प्रत्येक तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या अध्यक्षांची मिळून तालुका समिती बनविण्यात येईल, व तालुका समितीचे सभासद आपल्या सभासदांतून तालुका समितीचा अध्यक्ष निवडतील.

८. संस्थानातील प्रत्येक तालुका समितीला संस्थानच्या उत्पन्नाचा ठरावीक भाग मिळेल, व ती समिती गावच्या गरजांप्रमाणे ती रक्कम गाव-

गाव पंचायतींना वाटून देईल. प्रत्येक गाव पंचायतीने दर वर्षास तयार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकाची छाननी करणे, त्या तालुक्यातील गावांकरिता विशिष्ट जादा रकमेची सरकारकडे मागणी करणे, ही कामे प्रत्येक तालुका समिती करील, शिवाय तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचे कामकाज कसे चालले आहे, यासंबंधी दर तीन महिन्यांनी प्रत्येक तालुका समितीने सरकारकडे रिपोर्ट पाठवावयाचे आहेत.

९. (अ) श्रीमंत राजेसाहेब व संस्थानचे कायदेमंडळ मिळून संस्थानचे विधिमंडळ (लेजिस्लेचर) होईल. संस्थानचे कायदेकानू करण्याची जबाबदारी श्रीमंत राजेसाहेब आणि संस्थानचे कायदेमंडळ मिळून होणाऱ्या विधिमंडळाकडे राहील.

(आ) कायदेमंडळ ही संस्थानची वरिष्ठ संस्था राहील, आणि संस्थानचा सुव्यवस्थित राज्यकारभार करण्याकरिता जरूर असणारे कायदे व नियम ही संस्था करील, तसेच संस्थानचे जमाबंदीवर तिचा पूर्ण अधिकार राहील.

१०. (अ) या कायद्याच्या (२७ व्या) (आ) कलमात नमूद केलेल्या योजनेस अनुसरून संस्थानचे कायदेमंडळ पंधरा सभासदांचे राहील. संस्थानातील सर्व तालुका समतीचे विद्यमान अध्यक्ष कायदेमंडळाचे सभासद राहतील.

(आ) प्रत्येक तालुका समिती दर तीन वर्षास आपले अध्यक्षा-शिवाय आणखी दोन सभासद कायदेमंडळासाठी निवडून देईल. त्यापैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल.

(इ) वयाची अठरा वर्षे पूर्ण झाली असतील अशा औंध संस्थानच्या साक्षर व प्रौढ प्रजाजनांशिवाय दुसऱ्या कोणासही कायदेमंडळासाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

११. कायदेमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची असून ती कोणासही मोडता येणार नाही. पण या कायद्यातील कलम ४ व ११ प्रमाणे दरसाल $\frac{१}{३}$ सभासद

कायदेमंडळातून निवृत्त होतील व नवीन निवडून येणारे त्यांच्या जागी येतील.

१२. कायदेमंडळाची बैठक वर्षांतून दोन वेळा भरविण्यात येईल व दोन बैठकींच्या कालामध्ये सात महिन्यांहून अधिक काळ जाणार नाही.

१३. (स्पीकर आणि डेप्युटी स्पीकर) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवडणूक पहिल्या बैठकीच्या वेळी कायदेमंडळाचे सभासद करतील, प्रातिनिधिक सभेचे सभासद असेपर्यन्त अगर एखादी सरकारी नोकरी पत्करीपर्यन्त अगर प्रातिनिधिक सभेचा विश्वस्थ असेतोपर्यन्त अगर ते कोणत्याही अन्य कारणांकरिता राजीनामा देईपर्यन्त अध्यक्ष व उपाध्यक्ष हे आपल्या जागेवर राहतील.

१४. कायदेमंडळापुढील प्रश्नांचा निकाल अध्यक्ष अगर त्यांच्या जागी काम करणाऱ्या सभासदांशिवाय हजर असलेल्या व मत देऊ शकणाऱ्या सभासदांचे मताधिक्याने होईल. अध्यक्षांस प्रथम मत देता येणार नाही. पण मते समान पडल्यास त्यांस आपले मत कोणत्याही बाजूस देण्याचा अधिकार राहील.

१५. (अ) हजर असून मत देत असलेल्या सभासदाच्या मताधिक्यानेच कायद्याचे मसुदे (बिल्स) पसार करण्यात येतील व श्रीमंत राजेसाहेब यांची संमती मिळाल्यावर ते मसुदे कायदे होतील.

(आ) एखाद्या कायद्याच्या मसुद्यास तो कायदेमंडळाने नियमानुसार पसार केला असतानाही जर श्रीमंत राजेसाहेब त्यास संमती देण्याचे नाकारतील तर तो कायद्याचा मसुदा परत कायदे मंडळाकडे त्यांनी पाठविला पाहिजे. याप्रमाणे मसुदा परत पाठविताना सदर मसुद्याचा त्यांनी सुचविलेल्या शिफारशीस अनुसरून फेरविचार करावा. अशा सूचनांचा संदेश श्रीमंत राजेसाहेबांना कायदे मंडळास देता येईल. याप्रमाणे फेरविचारासाठी म्हणून

असा मसुदा श्रीमंत राजेसाहेबांचेकडून आल्यानंतर कायदेमंडळ त्या मसुद्याचा श्रीमंत राजेसाहेबांचे संदेशाप्रमाणे फेरविचार करील.

(इ) फेरविचाराकरिता पाठविलेल्या मसुद्यात ज्या शिफारशी-प्रमाणे फेरविचार व्हावा, असा श्रीमंत राजेसाहेबांचा संदेश असेल, त्या शिफारशी मान्य झाल्यास तो मसुदा कायदा म्हणून समजला जाईल, परंतु अशा शिफारशी कायदे मंडळास अमान्य झाल्यास श्रीमंत राजेसाहेबांना सदरहू कायद्याचे मसुद्यास संमती देण्याचे काम कायदे मंडळाच्या पुढील बैठकीपर्यन्त पुढे टाकता येईल. याप्रमाणे संमती न दिलेल्या मसुद्यास लागोपाठ तीन वेळा संमती देण्याचे त्यांना नाकारता येईल. मसुद्यास श्रीमंतांनी संमती न दिल्यामुळे फेरविचाराकरिता पुढे येऊनही तीनही वेळेस जर मूळ स्वरूपातच तो मसुदा मताधिक्याने पसार होईल तर तो मसुदा मूळ स्वरूपातच कायदा म्हणून समजला जाईल.

१६. संस्थानचा राज्यकारभार चालविण्याची सत्ता कायदेमंडळाचे वतीने अधिकारारूढ मंत्रिमंडळाकडून वापरण्यात येईल. कायदेमंडळातील सभासदांमधून श्रीमंत राजेसाहेब ज्यांना नेमतील अशा मुख्य मंत्र्यांचे व दोनपेक्षा जास्त नाही अशा उपमंत्र्यांचे मिळून मंत्रिमंडळ बनेल. राज्यकारभाराच्या सर्व बाबींसंबंधी मंत्रिमंडळ कायदेमंडळास जबाबदार राहील व कायदेमंडळाकडून अधिकारारूढ मंत्रिमंडळाविरुध्द अविश्वासाचा ठराव पसार झाल्यास त्या मंत्रिमंडळाला अधिकारनिवृत्त व्हावे लागेल.

१७. जमाबंदीच्या प्रत्येक वर्षारंभी मंत्रिमंडळ कायदेमंडळापुढे त्या वर्षाच्या वसुलाचे व खर्चाचे अंदाजपत्रक मांडील व या अंदाजपत्रकात खालील बाबींची तजवीज केली जाईल.

अ) संस्थानच्या उत्पन्नापैकी $\frac{1}{2}$ रक्कम राज्यव्यवस्थेचा खर्च चालविण्याकरता व श्रीमंताचे खाजगीकरिता व पोलिटिकल पेन्शनीकरिता म्हणून राहील.

आ) उरलेली $\frac{1}{2}$ रक्कम ग्रामपंचायती व तालुका समित्या यांनी करावयाच्या खर्चाकरिता राहील व ही रक्कम त्या त्या तालुक्याच्या वसुलाचे रकमेचे हिस्सेरशीने विभागली जाईल.

१८. कलम १७ (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चासंबंधाने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास आहे, परंतु १७ (आ) मधील रकमेसंबंधाने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास नाही.

१९. (अ) कायदेमंडळाने पसार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकावर सही करून त्याला श्रीमंत राजेसाहेब मान्यता देतील. अशा तऱ्हेने त्यांनी सही करून मान्यता दिल्याशिवाय संस्थानच्या उत्पन्नापैकी केला जाणारा कोणताही खर्च कायदेशीर समजला जाणार नाही.

(आ) तालुका समित्यांसाठी ठरवून देण्यात आलेल्या रकमेवर तालुका समितीचा पूर्ण ताबा राहील, परंतु त्यांच्या व्यवहाराची छाननी करण्याचा अधिका मंत्रिमंडळास व कायदेमंडळास आहे.

(इ) कलम १५ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच कलम १९ (अ) बाबतीत पसार झालेल्या बजेटला मान्यता न देण्यासंबंधी श्रीमंत राजेसाहेबांना अधिकार राहील.

२०. संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पध्दतीचे राहील, संस्थानच्या सरन्यायाधीशाकडून वारंवार ठरविले जाईल त्याप्रमाणे किरकोळ स्वरूपाचे दिवाणी दावे व फौजदारी खटले चालवून न्याय देण्याचे काम पंचायतीने करावयाचे आहे. याव्यतिरिक्त उरलेली न्यायदानाची कामे व पंचायतीच्या निकालावरील अपिले चालविण्याचे काम सरन्यायाधीशाकडून

करण्यात येईल. पंचायतीचे न्यायदानाचे काम मोफत चालेल, कोणासही दिवाणी आणि फौजदारी बाबतीत कायदेशीर सल्ला व बचावाची मदत मोफत मिळण्याची व्यवस्था सरकारकडून या बाबतीत हायकोर्टाकडून केल्या जाणाऱ्या नियमाप्रमाणेच केली जाईल.

२१. (अ) औंध संस्थानच्या सरन्यायाधीशांची नेमणूक श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांचेकडून केली जाईल व सरन्यायाधीश संस्थानच्या न्यायखात्याचे मुख्य म्हणून काम करतील. ग्रामपंचायतीने दिलेले निकाल, हुकूम अगर हुकूमनामे यावर झालेली अपिले अगर तपासणी अर्जाचे काम चालविणेचे व त्याचप्रमाणे त्यांचेकडून ठरविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्राबाहेरील असलेले फौजदारी व दिवाणी कज्जे चालविण्याचे काम सरन्यायाधीशांकडे राहील.

(आ) संस्थानच्या सरन्यायाधीशांच्या नेमणुकीचे वेळी त्यांची जी मुदत ठरली असेल त्या मुदतीपर्यन्त व त्यांची चांगली वर्तणूक असेतोपर्यन्त ते आपले अधिकार चालवितील.

२२. राज्यघटना अंमलात आल्यावर शक्य तितक्या लवकर अधिकारारूढ मंत्रिमंडळ सार्वत्रिक व मोफत, सक्तीच्या व शक्य तितके स्वावलंबी प्राथमिक शिक्षणाची सोय करील. तसेच औंध संस्थानच्या जनतेची अधिकाधिक सेवा करण्याची संधी देण्याच्या हेतूने योग्य नागरिक बनविण्यासाठी जेवढ्या शिक्षणाची जरूरी असेल तितकेच उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार करील. हा कायदा अंमलात आल्यापासून संस्थानातील सर्व निरक्षरता दूर करण्याच्या हेतूने संस्थानातील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरूषास मतदानाची योग्यता प्राप्त करून देण्याकरिता त्यांना साक्षर करण्याची योग्य ती तजवीज सरकार एक वर्षात करील.

२३. श्रीमंत राजेसाहेब हे संस्थानचे हिशेब व जमाखर्च तपासण्याकरिता मुख्य हिशेब-तपासनिसाची नेमणूक करतील व हे मुख्य हिशेब-तपासनीस या

...बतीत सरकारकडून केलेल्या नियमात नमूद केलेल्या कारणाशिवाय त्या जागेवरून काढले जाणार नाही.

२४. श्रीमंत राजेसाहेब हे औंध संस्थानच्या जनतेचे आद्य लोकसेवक व जनतेच्या विवेकबुद्धीचे विश्वस्त आहेत व या कायद्यात वर नमूद केलेल्या अधिकाराशिवाय खाली लिहिलेले अधिकार त्यांनी वापरावयाचे आहेत.

अ) सार्वभौम सरकाराशी व इतर संस्थानांशी असणाऱ्या संबंधाबद्दलची सर्व राजकीय कामे श्रीमंत राजेसाहेब यांच्या खास नजरेखाली चालतील.

आ) संस्थानच्या कायदेमंडळाची जरूरीच्या वेळी जादा बैठक बोलाविण्याचा अधिकार श्रीमंत राजेसाहेब यांना आहे.

इ) श्रीमंत राजेसाहेब हे अधिकारारूढ मंत्रिमंडळाचे विचाराने संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता जरूरीचे जाहीरनामे काढू शकतील, परंतु असे जाहीरनामे काढल्यानंतर ते कायदेमंडळाची जी प्रथम बैठक होईल त्या बैठकीत त्यांना कायदेमंडळाने संमती न दिल्यास ते जाहीरनामे त्या अधिवेशनाच्या समाप्तीनंतर रद्द म्हणून समजले जातील.

ई) संस्थानातील अधिकारारूढ मंत्रिमंडळ निःसंदिग्धपणाने संस्थानचा राज्यकारभार गैररीत्या चालवीत असल्याचे श्रीमंत राजेसाहेबांच्या निदर्शनास आल्यास श्रीमंत राजेसाहेब त्या मंत्रिमंडळास आपला कारभार तहकूब ठेवण्याबद्दल हुकूम देऊन त्याचा कारभार बंद ठेवू शकतील व असा हुकूम दिल्यापासून एक महिन्यापेक्षा जास्त नाही अशा मुदतीच्या आत त्यांनी कायदेमंडळाची सभा बोलाविली पाहिजे.

उ) श्रीमंत राजेसाहेबांना अधिकारारूढ मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून ग्रामपंचायतीत अगर कायदेमंडळात निवडून आलेल्या एखाद्या सभासदाची निवडणूक रद्द करण्याचा अधिकार आहे. मात्र या बाबतीत जरूर ते हुकूम निवडणुकीच्या तारखेपासून १ (एक) महिन्याच्या आत झाले पाहिजेत.

२५. (अ) मंत्रिमंडळाकडून केल्या जाणाऱ्या सर्व बाबी व करारमदार श्रीमंत राजेसाहेब यांच्या नावे झाले आहेत असे मानले जाईल व श्रीमंत राजेसाहेबांच्या वतीने मंत्रिमंडळाकडून त्याची अंमलबजावणी होईल.

(आ) हा कायदा अंमलात येण्यापूर्वी श्रीमंत राजेसाहेब यांनी केलेले सर्व करारमदार औंध संस्थानच्या सरकारच्या वतीने केले गेले होते असे समजण्यात येईल.

२६. (अ) औंध संस्थानचे मंत्रिमंडळ या कायद्यास पूरक व आनुषंगिक स्पष्टीकरणासाठी आवश्यक असे नियम तयार करील. पंचायती, तालुका समित्या, राज्यकारभार, न्यायदान, हिशेबतपासणी, शिक्षण, बेकारी निवारण, संस्थानच्या नोकरांच्या हितसंबंधाचे रक्षण वगैरे गोष्टींकरिता व या कायद्यात समावेश न केलेल्या गोष्टी यासंबंधी मुख्यत: नियम केले जातील.

(आ) हे नियम व दुरूस्त्या कायदेमंडळाने पसार केल्या पाहिजेत. कायदेमंडळ स्वत:च्या कामकाजासंबंधी नियम तयार करील.

२७. या कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी श्रीमंत राजेसाहेब खालील अधिकार तात्पुरते म्हणून आपल्याकडे राखून ठेवीत आहेत.

अ) श्रीमंत राजेसाहेब यांनी नेमलेल्या मंत्रिमंडळाविरूध्द पहिली दोन वर्षे अविश्वासाचा ठराव कायदेमंडळास मांडता येणार नाही.

आ) हा कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यन्त श्रीमंत राजेसाहेबांना कायदेमंडळासाठी पाच सभासदांपर्यन्त सभासद नेमून देता येतील. अशा सभासदांची मुदत एक वर्षाहून अधिक असणार नाही.

क) हा कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षांपर्यन्त श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी वार्षिक खर्चाकरिता ३६००० रुपये कायम करण्यात येत आहेत. या रकमेत पोलिटिकल पेन्शनचा समावेश होणार नाही.

२८. अ) या कायद्यातील कलमांच्या अर्थासंबंधी मतभेद उत्पन्न झाल्यास सरकार अगर जरूर असेल त्या इसमाने हायकोर्टाकडे अर्ज करावा. यासंबंधीचा निर्णय अर्ज केल्या दिवसापासून दोन महिन्यांचे आत देण्यात आला पाहिजे.

आ) हायकोर्टाचा निर्णय अखेरचा समजला जाईल, व तो सर्व पक्षांवर बंधनकारक राहील.

२९. पुढील परिशिष्टात नमूद केलेले कायदे त्या परिशिष्टातील दुसऱ्या कॉलममध्ये निर्दिष्ट केले आहेत तितके रद्द करण्यात येत आहेत.

| नंबर | वर्ष व कायदा | रद्द केलेला भाग |
|---|---|---|
| १ | सन १९३० चा पहिला कायदा | कलमे २० व २१ खेरीज बाकीची सर्व कलमे रद्द |
| २ | सन १९३१ चा चौथा कायदा | सर्व कायदा रद्द. |
| ३ | सन १९३८ चा तिसरा कायदा | सर्व कायदा रद्द. |

मंजूर तारीख ६-२-३९

सही सरकारची (मोर्तब)
राजे साहेब, सं. औंध.

औंध संस्थानचे राज्यघटनेच्या कायद्यात दुरुस्ती करणेबाबतचा कायदा सन १९४० चा ३ रा

ज्या अर्थी औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे जरूर आहे, त्याअर्थी असा कायदा करणेत येत आहे की,

१. या कायद्यास ' औंध संस्थानच्या राज्यघटनेच्या दुरुस्तीचा कायदा ' असे म्हणावे.

२. हा कायदा ता. ३-६-४० पासून औंध संस्थानास लागू होईल.

३. औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या कायद्यातील (ज्या कायद्यास यापुढे ' सदर कायदा ' असे संबोधण्यात आले आहे.) कलम ५ (अ) मधील पहिल्या ओळीतील ' साक्षर ' या शब्दास काट देण्यात यावा.

४. सदर कायद्याच्या कलम ५ (ई) मधील ' कोर्टाकडे ' या शब्दांना काट देऊन त्याऐवजी ' श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर ते नेमतील त्या अंमलदाराकडे ' असे नवीन शब्द घालण्यात यावेत.

५. सदर कायद्याच्या कलम ५ (ई) नंतर नवीन कलम ५ (उ) म्हणून घालण्यात यावे.

उ) कलम (ई) प्रमाणे दुरुस्त झालेली अगर त्या अन्वये कोणी अर्ज न केल्यास निवडणुकीपूर्वी प्रसिध्द झालेली यादी कायमची समजण्यात येईल व त्या यादीत दाखल असणारा कोणीही इसम मतदानास अपात्र होता अगर त्या यादीत दाखल नसणारा कोणीही इसम मतदानास पात्र असून त्याचे नाव यादीत दाखल व्हावयास पाहिजे होते अशी तक्रार कोणाही उमेदवारास अगर मतदारास करता येणार नाही.

६. सदर कायद्याच्या कलम १० (आ) मधील दुसऱ्या ओळीतील ' दोन ' या शब्दास काट देऊन त्याऐवजी ' एक ' असा शब्द नवीन घालावा, तसेच ' त्यापैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल ' या वाक्याला काट देण्यात यावा.

७ ७. सदर कायद्याच्या कलम १० (आ) नंतर खालील प्रमाणे नवीन कलम १० (इ) घालण्यात यावे.

इ) तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीकरिता तयार केलेल्या मतदाराचे यादीत ज्या इसमांची नावे नमूद आहेत अशा इसमांनी कायदेमंडळात एक सभासद निवडून देण्याचा आहे. या निवडणुकीस कोणाही औंध संस्थानात रहिवाशी असणाऱ्या अगर औंध संस्थानात ज्याच्या स्वत:च्या मालकीची अगर तो एकत्र हिंदु कुटुंबाचा सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाच्या मालकीची स्थावर मिळकत आहे अशा इसमास तो ग्रामपंचायत अगर तालुका समिती यांचा सभासद नसला तरीही उभे राहता येईल. निवडून आलेल्या सभासदांचे कायदेमंडळात फक्त तीन वर्षे सभासदत्व राहील. निवडणुकीचे तारखेपूर्वी पाच वर्षांचे अवधीत खरेदी घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे मात्र कोणासही निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

८. सदर कायद्याचे कलम १० (इ) रद्द करण्यात यावे व त्याऐवजी नवीन कलम १० (ई) म्हणून खालील प्रमाणे घालण्यात यावे.

(ई) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीस फक्त साक्षर व ज्याच्या वयाला २० वर्षे पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास फक्त उभे राहता येईल. संस्थानातील कोणाही मॅजिस्ट्रेटने सदर इसम साक्षर आहे, म्हणून दिलेले सर्टिफिकेट तो साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल व ते त्यांच्या साक्षरतेच्या प्रश्नावर कायमचे व निर्णयात्मक समजण्यात येईल.

९. सदर कायद्याच्या कलम २४ (उ) मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील मजकूर नवीन घालण्यात यावा.

" तसेच कलम ५ (अ) प्रमाणे अगर कलम १० (इ) प्रमाणे झालेल्या पंचायतीच्या सभासदांच्या अगर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या मतदारांनी

निवडलेल्या कायदेमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीबद्दल कोणाही सदर निवडणुकीस उभा असणाऱ्या अगर सदर निवडणुकीतील मतदार सदर निवडणूक गैरकायदा, अगर लाचलुचपत, फसवणूक, अगर धाकदपटशा यांनी दूषित असल्याबद्दल निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून आठ दिवसांत श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर त्यांनी नेमलेल्या निवडणूक चौकशी अंमलदार यांजकडे अगर त्यांनी नेमलेल्या निवडणूक चौकशी अंमलदार यांजकडे अगर त्यांनी तक्रार अर्ज निवडणूक जाहीर झाल्यापासून आठ दिवसांचे आत करता येईल व सरकारांनी केलेल्या नियमास अनुसरून चौकशी अंमलदार सदर अर्जाची चौकशी करून श्रीमंत राजेसाहेब यांकडे योग्य ती शिफारस करतील.

मंजूर ता. ३-६-४०

भवानराव (मोर्तब)
राजेसाहेब, संस्थान औंध

औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा सन १९४४ चा पहिला

ज्या अर्थी औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) अन्वये सदर कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यन्त पाच सभासदांपर्यन्त सभासद कायदेमंडळावर नेमून देण्याचा श्रीमंत राजेसाहेब यांना असलेला अधिकार त्यांनी आणखी पाच वर्षेपर्यन्त चालवावा असा कायदेमंडळाने ठराव केला असून त्याला श्रीमंत राजेसाहेबांनी मंजुरी दिलेली आहे व ज्या अर्थी या ठरावाची अंमलावरी करण्यासाठी औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्या अर्थी असा कायदा करण्यात येतो की,

१. लहान सरनामा -

या कायद्यास ` औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या १ ल्या कायद्याच्या दुरूस्तीचा कायदा सन १९४४ चा १ ला ` असे म्हणावे.

२. सुरूवात व व्याप्ती -

हा कायदा श्रीमंत राजेसाहेब यांनी जारी केलेला एतद्विषयक सन १९४४ चा ऑर्डिनन्स पहिला औंध संस्थानचे आज्ञापत्रिकेत प्रसिध्द झाल्या तारखेपासून अंमलात आला आहे असे समजण्यात यावे व तो सर्व संस्थानास लागू असेल.

३. औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम (आ) ची दुरूस्ती -

औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) ओळ पहिली यातील ` पाच वर्षेपर्यंन्त ` या शब्दाऐवजी ` दहा वर्षेपर्यंन्त ` असे शब्द घालण्यात यावेत व या दुरूस्तीनुसार अस्तित्वात येणारे पोटकलम (आ) हे प्रथमपासूनच सदर राज्यघटनेच्या कायद्यात ग्रंथित आहे असे समजण्यात यावे.

४. दुरूस्तीपूर्वीच्या नेमणुका दुरूस्तीनुसार असल्याचे ठरवून त्यांची मुदत निश्चित करणे -

श्रीमंत राजेसाहेबांनी दुरूस्तीपूर्वीच्या पोट कलमान्वये ज्या नामदार सभासदांना कायदेमंडळावर सभासद म्हणून नेमून दिले असेल त्यांच्या नेमणुका या दुरूस्त झालेल्या पोटकलमान्वये करण्यात आलेल्या आहेत असे समजण्यात यावे व त्यांच्या नेमणुकांची मुदत त्या करण्यात आल्या तारखेपासून एक वर्षाची राहावी.

मंजूर ता. २४-४-४४इ.

भवानराव (मोर्तब)
राजेसाहेब, सं. औंध

संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा
कायदा सन १९४५ चा बारावा

१. सरनामा : या कायद्यास संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा, सन १९४५ चा बारावा असे म्हणावे.

२. व्याप्ती : हा कायदा सर्व औंध संस्थानास लागू होईल.

३. सुरुवात : हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून अंमलात येईल.

४. (अ) औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा १ला यातील कलम २१ (अ) यातील ` सरन्यायाधीश संस्थानच्या ` या शब्दापुढे व न्यायखात्याचे मुख्य या शब्दामागे ` हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर ॲक्टखाली हायकोर्टात करावयाचे नियंत्रणास पात्र राहून बाकी बाबतीत संस्थानच्या ` असे शब्द घालण्यात येत आहेत.

(आ) सदर कायद्याचे कलम २८ (अ) मधील ` इसमाने ` या शब्दापुढील व ` अर्ज ` या शब्दामागील ` हायकोर्टाकडे ` या शब्दाऐवजी ` सरन्यायाधीश कोर्टाकडे ` असे शब्द घालण्यात येत आहेत. तसेच सदर कलमातील पोटकलम ` आ ` रद्द करून त्याऐवजी पुढीलप्रमाणे पोटकलम घालण्यात येत आहे.

आ) सरन्यायाधीश कोर्टाचे निकालावर नाराज पक्षकारास हायकोर्टाकडे अपील करण्याचा हक्क राहील.

मंजूर ता. १४-११-१९४५ इ.

भवानराव (मोर्तब)
राजेसाहेब, संस्थान औंध

औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणेसंबंधीचा कायदा १९४७ चा आठवा.

ज्या अर्थी औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणे जरूर आहे, त्या अर्थी यावरून खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे.

१. सरनामा : या कायद्यास ` औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा १९३९ चा पहिला दुरुस्त करणेसंबंधीचा कायदा सन १९४७ चा ८ वा असे म्हणावे.

२. सुरुवात व व्याप्ती : हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून सर्व औंध संस्थानास लागू होईल.

३. कलम : औंध संस्थानच्या राज्य घटनेचा कायदा १९३९ चा पहिला यातील कलमे १० व ११ कमी करून त्याऐवजी खालीलप्रमाणे नवीन कलम दाखल करण्यात येत आहेत.

१. औंध संस्थानचे कायदेमंडळ २७ सभासदांचे राहील. ते सभासद पुढीलप्रमाणे राहतील.

अ) सर्व तालुका समित्यांचे अध्यक्ष हे कायदेमंडळाचे सभासद राहतील.

आ) प्रत्येक तालुका समितीचे सभासदांतून त्या तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या पंचांनी निवडून दिलेला इसम हा त्या त्या तालुक्यातर्फे विधिमंडळाचा सभासद राहील.

इ) प्रत्येक तालुक्यातील मतदारांनी त्या त्या तालुक्यातर्फे दोन सभासद कायदेमंडळासाठी निवडून देण्याचे आहेत. सदर इसम ग्रामपंचायती अगर तालुका समित्या यांचे सभासद नसले तरी चालतील. मात्र ते औंध संस्थानचे रहिवासी असले पाहिजेत. अगर त्यांच्या स्वत:चे मालकीची किंवा ते एकत्र कुटुंबातील सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाचे मालकीची संस्थानात स्थावर

मिळकत असली पाहिजे. निवडणुकीचे तारखेपूर्वी पाच वर्षांचे अवधीत घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे कोणासही निवडणुकीत उभे राहण्याचा हक्क राहणार नाही.

ई) विधिमंडळाकरिता एक स्त्री सभासद त्या त्या तालुक्यातील मतदारांकडून निवडला जाईल. तो प्रत्येक तालुक्यातर्फे एक याप्रमाणे क्रमाक्रमाने निवडला जाईल. तालुकेवार स्त्री सभासद निवडणेसंबंधीचा क्रम ठरविण्याचा अधिकार मंत्रिमंडळास आहे. या स्त्री सभासदांची मुदत एक वर्ष राहील.

उ) औंध संस्थानातील कारखानदारातर्फे एक सभासद कायदेमंडळावर निवडून दिला जाईल.

ऊ) औंध संस्थानातील कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराकडून कामगारातर्फे दोन कामगार विधिमंडळासाठी निवडले जातील. या निवडणुकीत उभा राहणारा उमेदवार कामगार कारखान्यातील रजिस्टर्ड युनियनचा सभासद असला पाहिजे.

ए) प्रत्येक तालुक्यातील मतदारांकडून मतदारांचे यादीतील एक हरिजन इसम विधिमंडळातील सभासदांचे निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यातर्फे उमेदवार म्हणून निवडला जाईल, व पाच उमेदवारांतून एक उमेदवार विधिमंडळाचे २५ लोकनियुक्त सभासदांकडून बहुमताने विधिमंडळासाठी निवडला जाईल.

ऐ) विधिमंडळावर दोन सभासद श्रीमंत राजेसाहेब यांचेकडून नेमिले जातील व त्यांची मुदत एक वर्षाची राहील.

४.११ (अ) विधिमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची राहील. कलम १० पोट कलम (आ) यातील सभासद तो तालुका समितीचा सभासद असेतोपर्यन्त विधिमंडळाचा सभासद राहील. तालुका समितीतून निवृत्त झाल्यावर विधिमंडळातील त्या जागेची फेरनिवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

आ) कलम १० पोट कलम इ, उ, ऊ, ए अन्वये येणाऱ्या विधिमंडळातील सभासदांची मुदत चार वर्षांची राहील. त्यानंतर दर चार वर्षांनी सदर जागेची फेर निवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

इ) कलम १० यात नमूद केलेल्या ज्या सभासदांचे निवडणुकीबाबत हल्ली अमलात असलेल्या नियमात तरतूद केलेली नाही. त्या सभासदांचे निवडणुकीबाबत नियम करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास राहील.

ई) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत फक्त साक्षर व ज्याच्या वयास २१ वर्षे पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास निवडणुकीस उभे राहता येईल. संस्थानातील त्या त्या तालुक्यातील पदवीधर शिक्षक, ट्रेंड शिक्षक, अगर प्रमुख संचालक व संचालक यांनी दिलेले साक्षरतेचे सर्टिफिकेट सदर उमेदवार साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल, व ते त्याच्या साक्षरतेच्या प्रश्नावर निर्णयात्मक समजण्यात येईल.

५. कलम २७ रद्द करण्यात येत आहे व त्याऐवजी पुढीलप्रमाणे कलम घालण्यात येत आहे.

" श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी खर्चासाठी संस्थानच्या उत्पन्नापैकी $\frac{1}{10}$ रक्कम देण्यात येईल. "

६. सदर कायद्याचे कलम ४ यात " तीन वर्षांसाठी " असे शब्द आहेत त्याऐवजी " चार वर्षांसाठी " असे शब्द वाचण्यात यावेत.

मंजूर ता. २९-४-४७ इ.

भवानराव (मोर्तब)
राजेसाहेब, सं. औंध